# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १६/०१/२०२६
## मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तक्रार निवारण सभा घेवुन नागरिकांसोबत साधला सुसंवाद
## नागरिकांच्या समस्यांचे केले निवारण

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन मौदा आणि पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत नागरिकांच्या अडचणी जाणुन घेण्यासाठी तक्रार निवारण सभा घेवुन नागरिकांसोबत संवाद साधाला.**

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक १४/०१/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन मौदा येथे तसेच दिनांक १६/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत **अत्यंत दुर्गम भागात असलेले कोलीतमारा गावात तक्रार निवारण सभा घेवुन नागरिकांसोबत सुसंवाद साधुन त्यांच्या अडी—आडचणी आणि तक्रारी जाणुन घेतल्या.** मा. पोलीस अधिक्षकांनी तात्काळ जन सामन्यांच्या अडचणी जाणुन त्या सोडविल्या. उपस्थित नागरिकांनी मनमोकळे पणाने मा. पोलीस अधिक्षकांशी संवाद साधुन स्वत:च्या अडचणी त्यांच्या समोर मांडल्या. मा. पोलीस अधिक्षकांनी लवकारात लवकर जन सामन्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत संबधितांना आदेशीत केले. **पारशिवणी येथील कार्यक्रमात शाळकरी विदयार्थ्यांनी आदीवासी नृत्य सादर केले. मा. पोलीस अधिक्षकांनी त्यांचे कौतुक केले.** नमुद कार्यक्रमात १०० ते १५० जनसमुदाय हजर होता. सदर कार्यक्रमात उपविभागिय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.










जनता दरबार

# पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या जनता दरबाराला प्रतिसाद

## कोलितमारा येथे नागरिकांशी साधला थेट संवाद



▶ **पारशिवनी, वार्ताहर.** नागपूर ग्रामीणचे पोलिस अधिक्षक हर्ष ए. पोद्दार यांनी पारशिवनी पोलिस ठाणे हद्दीतील दुर्गम कोलितमारा गावात भेट देत तक्रार निवारण जनसभेद्वारे नागरिकांशी थेट संवाद साधला. शुक्रवारी (दि.१६) आयोजित या जनसभेत त्यांनी नागरिकांच्या अडचणींची माहिती घेत तत्काळ निवारणासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागरिकांनी मनमोकळ्या वातावरणात आपापल्या तक्रारी व समस्यांची मांडणी केली. पोलिस अधिक्षक पोद्दार यांनी सर्व सूचना काळजीपूर्वक ऐकून योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिले. जनतेच्या प्रश्नांवर झटपट निर्णय घेत नागरिकांचा विश्वास वाढवणे हेच पोलिस प्रशासनाचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सभेत उपस्थित शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आदिवासी नृत्याने कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली. पोलिस अधीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुकही केले. या तक्रार निवारण सभेस १०० ते १५० नागरिक उपस्थित होते. त्याचप्रमाणे कार्यक्रमास उपविभागीय पोलिस अधिकारी रमेश बरकते, पोलिस निरीक्षक राजेशकुमार थोरात, पोलिस कर्मचारी, पोलिस पाटील, स्थानिक सरपंच, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.